*"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -२०१५"*

**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग,

*जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्याः* http://wrd.maharashtra.gov.in/

क्र. ई-प्रशा/२०१६/३९८/१५/लपा-१

हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई.३२.
दिनांक:- ~~//२~~
१५/१/२०१६

प्रति,

सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत)
सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत)

विषय:- **ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील जलसंपदा विभागातील सर्व कार्यालयांचा आकृतीबंधाची नोंदविणेबाबत करावयाची कार्यवाही.**

**संदर्भ:** 1) जलसंपदा विभाग, शासन निर्णय प्रशा २०१४ / (२५१/१४) / लपा-१, दि. ११/११/२०१४
2) जलसंपदा विभाग, शासन पत्र क्र. ई-प्रशा/२०१५/३१८/१५ /लपा-१, दि. २९/१०/२०१५

उपरोक्त शासन निर्णयाअन्वये जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे करिता ई सेवा पुस्तक ही प्रणाली अनिवार्य केली असुन सदर प्रणाली टप्प्याटप्प्याने कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये जलसंपदा विभागातील कार्यालयांची नोंदणी संबंधितांनी केली असुन, त्यांचे मार्फत त्यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये Registration करण्यात आले आहे. तसेच माहिती भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आठ मोडयुल्स मध्ये माहिती भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रणालीमधील उर्वरीत मोड्युल्स देखील लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

सद्यस्थितीत जलसंपदा विभागातील मंजुर पदे व कार्यरत पदे यांचा आढावा घेण्याचे काम शासनस्तरावर सुरु आहे. याबाबतची सदर्भ क्र. २ अन्वयेची माहिती ई-सेवा पुस्तक प्रणालीमधुन उपलब्ध व्हावी यासाठी प्रणाली विकसनाचे काम पुर्ण करण्यात आले असुन आपले कार्यालयांकडुन कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेकडे प्राप्त झालेली आकृतीबंधानुसार मंजुर पदे व दि. १ नोव्हेंबर २०१५ रोजीची भरलेली पदे यांची माहिती या प्रणाली मध्ये भरण्यात आली आहे. यानुसार प्रणालीमधुन दोन प्रकारचे अहवाल उपलब्ध झाले असुन ते खालील लिंकवर उपलब्ध आहेत-

| | |
|---|---|
| १) AkrutiBandh Progress Report (Under Construction) | https://goo.gl/rw1XkC |
| २) AkrutiBandh PostWise Report (Under Construction) | https://goo.gl/bq6CLH |

तसेच हे अहवाल ई-सेवा पुस्तकाच्या लॉग इन पेजवर (https://services.mahaonline.gov.in/HRMS-WRD/Masters/Login.aspx देखील उपलब्ध आहेत.

या अहवालामधुन जलसंपदा विभागातील कोणत्याही एका कार्यालयाचे किंवा ते कार्यालय व त्याखालील सर्व कार्यालये यांचे आकृतीबंधानुसार मंजुर पदे व दि. १ नोव्हेंबर २०१५ रोजीची भरलेली पदे यांची माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच दुसऱ्या अहवालानुसार पदनामनिहाय मंजुर पदे व भरलेली पदे यांची माहिती उपलब्ध झालेली आहे. सदर माहिती ही अतिशय महत्वपुर्ण असुन ही माहिती एकत्रित करण्यासाठी आपले कार्यालयातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी मेहनत घेतलेली आहे. अशा प्रकारे एकत्रितपणे प्राप्त झालेली माहिती विभागातील आस्थापनाविषयक धोरणे निश्चित करण्यासाठी कामाला येणार आहे. यानिमित्ताने या प्रकल्पांशी संबंधित कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे येथील अधिकारी /

कर्मचारी, क्षेत्रीय स्तरावरुन माहिती पुरविणारे नोडल अधिकारी, उप/सहायक अधीक्षक अभियंता, उप-कार्यकारी अभियंता व संबंधित लिपिक यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

भविष्यामध्ये विभागातील कार्यालयांचा आकृतीबंध सुधारणे, व इतर सेवा विषयक विविध बाबी ई-सेवा पुस्तक प्रणालीमधुन पार पाडण्याचे प्रस्तावित आहे. या प्रणालीमधील माहितीचे एकत्रिकरणाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सेवाविषयक बाबी जसे-पदोन्नती, जेष्ठता सुची, वेतन, वेतनवाढ, गोपनीय अहवाल, प्रशिक्षण, बदली, निवृत्ती, इ. विषयक बाबी जलदगतीने पार पाडणे शक्य होणार आहे. या अनुषंगाने उपरोक्त अहवालामध्ये दर्शविण्यात आलेली माहिती अचुक असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व कार्यालय प्रमुखांनी या अहवालाची पडताळणी करुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रृटी असल्यास (उदा- कार्यालयांची नावे, त्यांची hierarchy, कार्यालयांचे मुख्यालय, मंजुर आकृतीबंध व भरलेली पदे इ.) दि. २७ जानेवारी २०१६ पर्यंत अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे निदर्शणास आणुन त्रृटीचे निराकरण करुन घ्यावे. भविष्यात अशा प्रकारची त्रृटी राहुन गेल्यास, त्यास संबंधित कार्यालयाचे प्रमुख जबाबदार राहतील, हे आपले निदर्शणास आणण्यात येत आहे.

ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील आकृतीबंध अहवालामध्ये दि. १ नोव्हेंबर २०१५ रोजीनुसार कार्यरत असलेल्या पदांची माहिती भरण्यात आली आहे. आता या पदांनिहाय कार्यरत व्यक्तींचे मॅपिंग संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचा आधार क्रमांक वापरुन करावयाचा आहे. याबाबत कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येणार असुन, त्यांनी निर्देशानुसार संबंधित कार्यालयांचे नोडल अधिकारी, उप/सहायक अधीक्षक अभियंता, उप-कार्यकारी अभियंता व संबंधित लिपिक यांनी आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. तरी या पत्रान्वये असे निर्देश देण्यात येत आहेत की, दि. १ जानेवारी २०१६ रोजी आपले कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची माहिती कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे निर्देशानुसार एकत्रित करुन तयार ठेवावी व कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे नियोजनानुसार संबंधितांनी ती प्रणालीमध्ये अचुकरित्या भरावी. याबाबत सविस्तर सुचना कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचेमार्फत देण्यात येतील.

अशा प्रकारे माहिती भरुन झाल्यानंतर या माहितीचा वापर करुन विविध कार्यालयांचा आकृतीबंध सुधारीत करणे, रिक्त पदे भरण्यासाठी माहिती उपलब्ध करणे, बदली / पदोन्नती यांचेसाठी माहिती मिळविणे इ. कार्यवाही याच प्रणालीमधुन होणार आहे. तसेच भविष्यात या प्रणालीमार्फतच वेतन अदा करण्याचे प्रस्तावित असल्याकारणाने कोणताही कार्यरत अधिकारी / कर्मचारी प्रणालीच्या बाहेर राहणार नाही, याची खबरदारी संबंधित कार्यालयाचे प्रमुख यांनी घ्यावी, अन्यथा भविष्यात कोणतीह अडचण उद्भवली तर त्यांना याबाबत जबाबदार धरण्यात येईल.

तरी सदर प्रणाली यशस्वीरित्या विकसित होऊन त्यातील माहिती शासकीय कामासाठी वापरता यावी यासाठी याकामाकडे वैयक्तिकरित्या लक्ष घालावे.

डॉ. संजय बेलसरे
शासनाचे उपसचिव

प्रतिलिपीः

१) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांनी याबाबत सर्व संबंधिताना email/SMS द्वारे अवगत करुन याबाबतचा पत्रव्यवहार संकेतस्थळावर अपलोड करावा.
२) सह-सचिव, सेवाः याबाबतचा आढावा घेऊन सचिव, लाक्षेवि यांना अहवाल सादर करावा.
३) सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, (स्थापत्य / विद्युत / यांत्रिकी) यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.